संस्कार मंदिर संस्थेचे

कला व वाणिज्य महाविद्यालय, वारजे-माळवाडी, पुणे-५८

विद्याथी विकास मंडळ

# भारतीय स्वातंत्र्यचळवळीच्या व स्वातंत्रसैनिकांच्या गौरवार्थ आयोजित उपक्रमांचा अहवाल

संस्कार मंदिर संस्थेचे, कला व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळामार्फत भारत छोडो आंदोलनास ७५ वर्षे व भारतीय स्वातांत्र्यास ७० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. बुधवार, दि. ०९/०८/२०१७ रोजी सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संकेतस्थळावर विशेष शपथ तसेच देशाचे स्वातंत्र्य आबाधीत राहील व देशात ऐक्याची भावना सर्वधर्मसमभाव राहिल अशी शपथ देण्यात आली.

बुधवार, दि.१६/०८/२०१७ महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ.राजेंद्र थोरात यांनी थोर स्वातंत्र्य सेनानींची माहिती दिली. तसेच या कार्यक्रमाच्या निमित्ताने भारताच्या स्वातंत्र्यात स्वातंत्र्य सेनानीचे योगदान या विषयावर विद्यार्थ्यांबरोबर चर्चा झाली.

रविवार, दि.१३/०८/२०१७ रोजी ऐतिहासिक शनिवारवाड्यास भेट दिली. सदर भेटीत १८व्या शतकात मराठे व पेशव्यांनी देशासाठै दिलेल्या बलीदानाचै माहीती विद्यार्थ्यांना देण्यात आली. सोमवार,दि.२१/०८/२०१७ रोजी दिनकर केळकर संग्रहालयास भेट देऊन विद्यार्थ्यांना जतन केलेल्या प्राचीन वस्तूंची माहिती देण्यात आली. त्यानंतर बुधवार, दि.२३/०८/२०१७ रोजी सिंहगडास भेट दिली.

तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी विकास अधिका-यांनी विद्यार्थ्यांना या संकेतस्थळावर उपलब्ध असणा-या प्रश्नमंजुषा कार्यक्रमाची माहिती दिली व सदर उपक्रमात विद्यार्थ्यांना सहभागी होण्यास प्रवृत्त केले.

वरील उपक्रमात विद्यार्थ्यांनै उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. तसेच महाविद्यालय प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

Bidyasagar

विद्यार्थी कल्याण अधिकारी
(S.W.O.)
कला व वाणिज्य महाविद्यालय
वारजे-माळवाडी, पुणे-५८

कला व वाणिज्य महाविद्यालय
आवडी क्र.
PU/PN/AC/
149/2000
19/9/2000
माळवाडी, पुणे-५८

for PRINCIPAL
Arts & Commerce College
Warje-Malwadi, Pune-58

POCO
SHOT ON POCO M2